# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२, २५२२३९०


क्र.म.वि./ 4885

दिनांक 10/१२/२०१६

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

विषय :–सत्र २०१७–१८ चे निरंतर संलग्निकरणाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार आपल्या महाविद्यालयात सुरू असलेल्या अभ्यासक्रमांचा निरंतर संलग्निकरण काळ सत्र २०१७–१८ पासुन पुढे वाढविण्यासाठी विद्यापीठाव्दारे स्थानीय चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. विद्यापीठव्दारे निर्गमित **निर्देश क्र. ८२/२०१६** मधील तरतुदीनुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या निरंतर संलग्किरणाची प्रक्रिया ही शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी पुर्ण करून चालु सत्रात महाविद्यालयाला निरंतर संलग्निकरण आहे किंवा नाही तसेच सदर सत्रात विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे किंवा नाही याबाबतच्या सुचना सर्व संबंधीत महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी विद्यापीठाला देणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रत्येक महाविद्यालयाने शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी स्थानीय चौकशी समित्यांच्या भेटी करून त्याचे अहवाल विद्यापीठात वेळीच सादर होतील याची खबरदारी घेणे गरजेचे आहे.

करिता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकरिता गठीत स्थानिय चौकशी समितीचे अध्यक्ष व सदस्यांशी समिती गठीत झाल्यापासुन १५ दिवसांत संपर्क करून समितीची भेट निश्चित करावी जी महाविद्यालय समित्यांच्या भेटी करून घेणार नाही अशा महाविद्यालयांचे चालु शैक्षणिक सत्राचे प्रवेश गोठविण्यात येईल याची वेळीच कृपया नोंद घ्यावी.

**टिप:– प्रत्येक महाविद्यालयांना ज्या अभ्यासक्रमांचा निरंतर संलग्निकरण काळ वाढवायचा आहे त्याकरिता दरवर्षी ३१ ऑगस्ट पुर्वी निरंतर संलग्निकरण अर्ज विद्यापीठात ऑनलाईन सादर करणे गरजेचे आहे. निर्देश क्र. ८२/२०१६ मधील तरतुदीनुसार पुढील शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी निरंतर संलग्निकरणाची संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करावयाची असल्याने ज्या महाविद्यालयाने निरंतर संलग्निकरण प्रस्ताव सादर केले नसतील त्यांनी त्वरीत प्रस्ताव विलंबशुल्कासह सादर करावा.**

कळावे.

आपला,

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव(म.वि.)
(अति.कार्य.)